


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

त्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : २७२ वा | मंगळवार | दि. ३१ डिसेंबर २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्हाधिकारी कार्यालयात भ्रष्टाचाराला संरक्षण कशासाठी?

## विजय दत्तात्रय टेकाळेंचे १०० अपराध केंव्हाच भरले, कारवाई मात्र नाहीच

## महसूल विभागातील भ्रष्टाचाराला अफरातफरी करून पुढाकार देणाऱ्या त्या हर...धन.. चे पोलखोल पुढील सत्रात...

जनसंचलन/बुलढाणा

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात गेल्या अनेक वर्षापासून तलाठी आणि मंडळ अधिकारी या पदावर कार्यरत राहून विजय दत्तात्रय टेकाळे या महाठगाने बेबंदपणे आणि बेशरमपणे भ्रष्टाचार केला. या भ्रष्टाचारातून प्रचंड माया जमवली. बेनामी संपत्ती गोळा केली. मात्र, अशा महाठगावर कारवाई करण्याऐवजी त्याला महसूल प्रशासनाकडून प्रमाणाच्या बाहेर संरक्षण दिले जात आहे. टेकाळेंच्या भ्रष्टाचाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचे या निमित्ताने सिद्ध होत आहे. महाभारतामध्ये शिशुपाल आणि कृष्णाच्या संबंधांवर एक महत्वपूर्ण प्रसंग आहे. शिशुपालाचे १०० अपराध झाल्याशिवाय त्याला मारणार नाही, अशी प्रतिज्ञा भगवान श्रीकृष्णाने घेतली होती, त्यामुळे शिशुपाल चांगलाच चेकाळला होता व तो पापांवर पापे करीत होता. परंतु भगवान श्रीकृष्ण हे आपल्या शपथेशी बांधलेले असल्या कारणाने त्यांनी शिशुपालावर कोणतीही कारवाई केली नाही. परंतु जेंव्हा शिशुपालाचे १०० अपराध पूर्ण झाले, त्यानंतर भगवान श्रीकृष्णाने आपल्या सुदर्शन चक्राने शिशुपालाचे मुंडके उडवले व त्याचा वध केला. आजच्या आधुनिक काळात आणि भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात सध्या कुणाच्याही अपराधाला शिक्षा करण्याचा अधिकार हा केवळ मा. न्यायालयाला आहे. तो त्याप्रमाणेच झाला पाहिजे. परंतु कधी-कधी परिस्थिती त्याला अपवादात्मक बनते. तोच अपवाद सध्या जिल्हाधिकारी कार्यालयात दिसून येत आहे. गेल्या २५ ते ३० वर्षांच्या आपल्या शासकीय नोकरीत विजय दत्तात्रय टेकाळे यांनी आपल्या पदाचा १०० वेळा नाही तर त्यापेक्षा कितीतरी अधिक वेळा दुरुपयोग केला आहे. त्यांनी १०० पेक्षा जास्त भ्रष्टाचाराची प्रकरणे केलेली आहेत. विजय दत्तात्रय टेकाळे हे भ्रष्टाचारासाठी अक्षरशः वेडेपिसे झालेले आहेत. त्यांना भ्रष्टाचाराचे एकप्रकारे व्यसनच जडले आहे. कदाचित एक वेळ टेकाळे हे श्वास न घेता जगू शकतील परंतु भ्रष्टाचार केल्याशिवाय जगूच शकत नाही ही स्थिती आहे. टेकाळे यांनी आजवर भ्रष्टाचार करून अनेकांची आर्थिक लुबाडणूक केली आहे. प्रचंड गैरव्यवहार केले आहेत. टेकाळेंच्या बेशरमपणाची हद्द एव्हढी आहे की, ज्या शासनाची ते चाकरी करतात, ज्या शासनाचा पगार खातात, त्याच शासनाच्या महसुलाला त्यांनी मोठे भगदाड पाडले आहे. अनेक नागरिकांच्या जमिनीच्या सातबारा कागदपत्रांमध्ये त्यांनी हेरफेर केला आहे. स्वतःच्याच सेवानियमांचा भंग केला आहे. वर्षानुवर्षे एकाच विभागात, एकाच पदावर ते बेकायदेशीरपणे राहिलेले आहेत. बदली झाल्यानंतरही त्यांनी आपल्याच अधिकाऱ्यांच्या आदेशांना केराची टोपली दाखवली आहे. दुसरीकडे आपले राजकीय हितसंबंध जपत त्यांनी लोकप्रतिनिधींशी अर्थपूर्ण संधान सांधले. गेल्या २० वर्षात या ठिकाणी अनेक जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी आले, परंतु कुणाचीही हिम्मत टेकाळेंवर कारवाई करण्याची झाली नसल्याचे दिसून येते. टेकाळेंसमोर अधिकारी एव्हढी लाचारी का पत्करतात, हेच समजून येत नाही. विजय टेकाळे यांनी अनेकदा न्यायालयांच्या आदेशांचीही पायमल्ली केली आहे. खरे-तर न्यायालयाच्या अवमानने प्रकरणी तरी त्यांच्यावर कारवाई अपेक्षित आहे. परंतु टेकाळेंवर कोणतीही कारवाई नाही. यावरून जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रशासन भ्रष्टाचाराच्या वाळवीने किती पोखरून टाकले आहे, हे दिसून येते. विजय टेकाळे हे जिल्हाधिकारी कार्यालयातील एक असे शिशुपाल आहेत, ज्यांच्यावर कारवाई करायला अद्यापही कोणी भगवान श्रीकृष्णासारखा




धजावला नाही. गुळाला जसा मुंगळा घट्ट चिकटतो, तसे टेकाळे हे भ्रष्टाचाराची गडगंज पैसा आणि प्रचंड चल अचल अवैध संपत्तीच्या बळावर जिल्हाधिकारी कार्यालयाला चिकटून बसलेले आहेत.टेकाळे हे कितीही बदमाशा करून, नालायकपणा करून आणि बेशरमपणा करून नोकरीत कायम असले, तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने त्यांच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा व त्यांना जो कोणी अधिकारी त्यांच्या प्रकरणात पांघरून टाकत असेल त्याचा ही उलगडा करीतच राहणार आणि जोपर्यंत टेकाळे यांनी भ्रष्टाचारातून कमावलेली अवैध चल अचल संपत्ती शासन तिजोरीत जमा करून टेकाळे यांना गजाआड केले जात नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही

**अजून बरेच काही पुढील भागात...**

## ११ जड गुन्हे असलेला हा बारक्या आता पोलिसांच्या जाळ्यात झाला जेरबंद!...

जनसंचलन/बुलढाणा

खून,जबरी चोरी अशा तब्बल ११ गुन्हे दाखल असलेल्या बारक्याला एसपींच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. बुलढाणा जिल्ह्यात गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले अनेक गुन्हेगार मोकाट आहेत. त्यांचा शोध घेण्यात येत आहे. त्यापैकी एक खुन,चोरी,जबरी चोरी अशा गंभीर मालमत्तेच्या गुन्ह्यांतील फरार आरोपी पवन उर्फ बारक्या पवार रा. सिंदखेड राजा याचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे. पवन उर्फ बारक्या मनोहर पवार वय २४ वर्ष रा.सिं. राजा याला ताब्यात घेऊन एकुण ११ गुन्हे उघडकीस आले आहे.ही कार्यवाही पीएसआय सचिन कानडे,पीएसआय प्रताप बजाड,शरद गिरी,शेख चाँद,पुरुषोत्तम आघाव,गणेश पाटील, युवराज राठोड,मंगेश सनगाळे,गजानन गोरले,दिपक वायाळ,विजय सोनोने,आशा मोरे, शिवानंद मुंढे, टेकाळे,हेलगे राजू आडवे, ऋषिकेश खंडेराव यांनी केली आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मलकापूर तालुक्यात अवकाळीचा तडाखा रब्बी पिकांचे नुकसान

**जनसंचलन/मलकापूर**

तालुक्यातील पाच महसुली मंडळांमध्ये शनिवारी रात्री १४ मी.मी. पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे रब्बी हंगामातील बहरलेल्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर वातावरणात अचानक बदल झाल्याने साथीच्या आजारांची शक्यता वर्तवली जात आहे. यंदा तालुक्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. त्यामुळे खरीपाच्या पिकांचे आधीच बऱ्यापैकी नुकसान झाले आहे. आता रब्बीचा हंगाम योग्य पद्धतीने जाईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, डिसेंबरच्या उत्तरार्धात शनिवारी रात्री अवकाळी पावसाने हजेरी लावली. शनिवारी रात्री ९ वाजेनंतर वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. मलकापूर तालुक्यातील पाच महसुली मंडळात १४ मी.मी. पाऊस झाला. त्यात मलकापूर १५.५ मी.मी., दाताळा १२.३ मी.मी., नरवेल २.८ मी.मी., धरणगांव १५.५ मी.मी. तर जांबुळधाबा महसुली मंडळात सर्वाधिक २४.५ मी.मी. पावसाची नोंद शनिवारी रात्री झाली आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार अवकाळी पावसाची शक्यता होती. त्या अनुषंगाने अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बीच्या हरभरा, गहू, मका आदी पिकांच्या नुकसानाची शक्यता आहे, तर बहुतांश शेतात तुरीच्या पिकाच्यादेखील नुकसानीची शक्यता वर्तवली जात आहे. सुदैवाने तालुक्यातील काही शिवारामध्ये अवकाळी पाऊस झाला नाही, मात्र येत्या दोन दिवसांत पुन्हा अवकाळी पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या आहेत.

# व्हॉइस ऑफ मीडिया चिखली तालुका कार्यकारिणी गठित !

**जनसंचलन/ चिखली**

व्हॉइस ऑफ मीडिया चिखली तालुका कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये सन २०२५-२६ वर्षाच्या कार्यकाळासाठी अमोल जोशी यांची अध्यक्षपदी तर सचिवपदी ओमप्रकाश खत्री यांची निवड करण्यात आली आहे. स्थानिक विश्रामगृहावर २९ डिसेंबर रोजी संघटनेची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी व्हॉइस ऑफ मीडियाचे राज्य संघटक सुधीर चेके पाटील होते. जिल्हा उपाध्यक्ष मंगेश पळसकर, गोपाल तुपकर, ज्येष्ठ पत्रकार अनिल पळसकर, महेश वाधवाणी, प्रकाश मेहेत्रे, संजय खेडेकर, समाधान गाडेकर, उद्धव थुट्टे पाटील, शे. युसुफ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नूतन कार्यकारिणीत अध्यक्ष अमोल जोशी, उपाध्यक्ष संजय भालेराव, तन्झीम हुसेन, सचिव ओमप्रकाश खत्री, सहसचिव विष्णू इंगळे, कोषाध्यक्ष विजय गोंधणे, संघटक बळीराम गुंजाळ, सहसंघटक राजू खरात तर प्रसिद्धी प्रमुखपदी आकाश डोणगावकर यांची निवड करण्यात आली. प्रास्ताविक युसुफ शेख यांनी केले. राज्य संघटक सुधीर चेके पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांकडून विविध खाद्यपदार्थांची विक्री!

**जनसंचलन/मासरूळ**

मासरूळ येथून जवळच असलेल्या वरुड येथील शरद पवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात मुक्त उपक्रमांतर्गत २७ डिसेंबर रोजी बाल आनंद मेळावा घेण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांची विक्री करून व्यावहारिक ज्ञान मिळवले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य के.टी. तायडे, प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच पती अमोल बुरजे, उपसरपंच दिलीप पांडव, तंटामुक्ती अध्यक्ष पंडित राऊत, पोलिस पाटील संजय शिवणकर उपस्थित होते. मेळाव्यात सर्व मान्यवरांनी स्वतः खरेदीचा व विद्यार्थ्यांनी बनविलेल्या खाद्यपदार्थांचा आस्वादही घेतला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञानावर आधारित प्रश्न विचारले. बाल आनंद मेळाव्यात परिसरातील भाजीपाला, फळे, पाककृती, व्यवसाय आनंद मेळाव्यात उपस्थित मान्यवर. ओळख, व्यवहार ज्ञान, मूलभूत क्रिया, नवनिर्मिती, मनोरंजन आदी आनंददायी शिक्षणाची वैशिष्ट्ये अनुभवायला मिळाली. यात भाजीपाला व फळे स्टॉल, पोहे, इडली, भेळ, गुलाब जामून, जिलेबी, पाणीपुरी, समोसे, डोसा, चहा, कॉफी आदी खाद्यपदार्थ स्टॉल, हेड मसाज, हस्त कलाकृती, मनोरंजक खेळ स्टॉल मांडण्यात आले होते. सदर मेळाव्याला ग्रामस्थांनी भेट देत खरेदी केल्याने विद्यार्थ्यांच्या आनंदात भर पडली, तसेच मान्यवरांच्या हस्ते प्रथम पाच क्रमांक आलेले स्टॉलला बक्षीस देण्यात आले. या मेळाव्यात हजारो रुपयांची उलाढाल झाली. या मेळाव्यास मुख्याध्यापक भुते, गाढे, सीताफळे, हुडेकर, शरदचंद्र वारे, कांडेले, दिनेश जाधव, पवार, जेऊघाले, पालकर, तरमळे, भिवसनकर, कोल्हे, पंडित सावळे, अशोक शिंदे, उखर्डा मघाडे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.




# दरेगाव येथील स्वच्छता अभियानाचे तीन तेरा गावात कचऱ्याचे साम्राज्य !

## तक्रारीनंतरही चौकशी करण्यास टाळाटाळ; चौकशीची मागणी



**जनसंचलन/ साखरखेर्डा**

दरेगाव आदर्श गाव संकल्प योजनेत सहभागी आहे; परंतु गावात स्वच्छता अभियानाचे तीन तेरा वाजले आहेत. गावात जागोजागी घनकचरा, रस्त्यावर पाण्याचे डबके साचले आहे. यासंदर्भात तक्रार करूनही पंचायत समितीने कोणतीच दखल घेतली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरेगाव ग्रामपंचायत आदर्श गाव संकल्प योजनेत सहभागी झाले आहे. आदर्श गाव संकल्पनेनुसार गावातील घनकचरा व्यवस्थापन करणे आवश्यक आहे; परंतु आजही गावातील अनेक भागांत कचरा कुंडी लावण्यात आली नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर विहीर असून, विहिरीच्या परिसरात घनकचरा टाकला जात असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ग्रामपंचायतीने दखल घ्यावी, यासाठी आत्माराम गाडे यांनी ग्रामसभेत ठराव मांडला; परंतु, नंतर कोणतीच दखल घेण्यात आली नाही. त्यांनी २ डिसेंबर रोजी पंचायत अधिकारी यांनी लेखी स्वरूपात उत्तर दिले नाही. त्यामुळे गावात स्वच्छता अभियानाचे तीनतेरा वाजले असून, या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आत्माराम गाडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली. त्यांनी विस्तार अधिकारी आरोग्य विभागाकडे चौकशी करण्याचे आदेश दिले. १८ ला चौकशी होणार म्हणून गाडे दिवसभर ग्रामपंचायत समोर बसले; परंतु आरोग्य विस्तार अधिकारी गावाकडे फिरकलेसुद्धा नाही. १० दिवस होऊनही पंचायतीचे आरोग्य विस्तार अधिकारी यांनी लेखी स्वरूपात उत्तर दिले नाही. त्यामुळे गावात स्वच्छता अभियानाचे तीनतेरा वाजले असून, या कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आत्माराम गाडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शेतीच्या बांधावरून वाद, एकाचे सहा दात पाडले !

जनसंचलन/मेहकर



शेतीच्या बांधावरून वाद होऊन एकास सहा जणांनी मारहाण केली. मारहाणीत त्याचे सहा दात पाडल्याची घटना सुकटी येथे २७ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी पोलिसांनी सहा जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुदाम रामकिसन धांडे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शिवाजी रुस्तुम धांडे, कैलास मदन धांडे, गणेश रामेश्वर धांडे, पवन शिवाजी धांडे, सोनु शिवाजी धांडे, मदन रुस्तुम धांडे आदींनी त्यांच्या भावजयीबरोबर वाद घातला, तसेच धक्काबुक्की केली. भावजयीला वाचवण्यासाठी सुदाम धांडे तेथे गेले असता आरोपींनी त्यांना मारहाण केली तसेच शिवाजी धांडे याने तोंडावर बुक्की मारून सहा दात पाडले. इतरांनीही मारहाण केली. या प्रकरणी सुदाम धांडे यांच्या फिर्यादीवरून मेहकर पोलिसांनी आरोपी विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गणेश कड यांचेकडे देण्यात आला आहे.

# फुले दाम्पत्य सन्मानदिनानिमित्त माळी महासंघाच्या वतीने महारॅली

जनसंचलन/ जळगाव जामोद

महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी भारतातील मुलींची पहिली शाळा, भिडेवाडा येथे सुरू केली. यानिमित्त माळी महासंघाच्या वतीने पुणे येथे १ जानेवारी २०२५ रोजी भिडेवाडा ते फुलेवाडा अशी फुले दाम्पत्य सन्मान दिन महारॅली आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे, प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील समाजबांधव यामध्ये सहभागी होणार आहेत. भिडेवाडा येथे राष्ट्रीय स्मारकाची उभारणी व्हावी, ही मुख्य मागणी घेऊन २०१४ पासून माळी महासंघाच्या वतीने सन्मान दिन महारॅलीला सुरुवात करण्यात आली. या मागणीला नऊ वर्षांनंतर यश आले. सध्या भिडेवाडा येथे राष्ट्रीय स्मारकाचे काम सुरू झाले आहे. या पृष्ठभूमीवर १ जानेवारी रोजी फुले दाम्पत्यांना अभिवादन व त्यांचा सन्मान करण्यासाठी या महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली पुणे येथे भिडेवाडा ते फुलेवाडा अशी राहणार असून, सोबतच याठिकाणी राष्ट्रीय स्मारकाच्या यशाचे प्रतीक म्हणून माळी समाज एकता विजय दिन साजरा करण्यात येणार या महारॅलीत माळी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन माळी महासंघाचे राष्ट्रीय सचिव रवींद्र अंबाडकर, राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रा. नानासाहेब कांडलकर, उपाध्यक्ष काळुराम अण्णा गायकवाड, रॅली समितीचे संयोजक संतोष अण्णा लोंढे, रॅलीचे संयोजक दीपक अण्णा जगताप, विभागीय अध्यक्ष राजेश जावरकर वकील संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष अ‍ॅड. बाळासाहेब खिरोडकर, जिल्हा अध्यक्ष गजानन वानखडे, शिक्षक आघाडी जिल्हाध्यक्ष शरद सातव, तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे, शिक्षक आघाडी अध्यक्ष यशवंत उमरकर, माळी महासंघ पदाधिकारी राधेश्याम जाधव, नितीन उमाळे, पी. पी. खिरोडकर, कैलास इंगळे, रघुनाथ बोदडे यांनी केले आहे

# आरटीओकडे तक्रार केल्याने मारहाण चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

जनसंचलन/मोताळा



आरटीओ कडे तक्रार दिल्याच्या कारणावरून एक वृद्ध आणि महिलेला अश्लील शिविगाळ करून मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २७ डिसेंबर रोजी राजूर येथे घडली आहे. याप्रकरणी फिर्यादीवरून चार जणांविरुद्ध बोराखेडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजूर येथील जियाउल्ला खा रहीम खा यांनी बोराखेडी पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार २७ डिसेंबर रोजी सायंकाळी ते कुटुंबासह घरी होते. यावेळी गावातील हारून खा हमीद खा अधिक तीन जण हे आले आणि तुमचा मुलगा सईद खान कोठे आहे, असे विचारले. यावेळी फिर्यादीने तो ढाब्यावर गेला, असे सांगितले त्यावर हारून खान याने सांगितले की, त्याने आमच्या गाड्यांची आरटीओकडे तक्रार केली आहे, असे म्हणत फिर्यादीसोबत वाद करून लोटपाट केली. दरम्यान, शिवीगाळ करू नका असे फिर्यादीने म्हटले असता हारून खा यांच्यासोबत असलेले तीन जण घरात आले आणि तुमच्या मुलाने दिलेली तक्रार कोठे आहे, असे म्हणत घरात ठेवलेल्या थैलीमधील कागदपत्रे व ६ हजार ३०० रुपयांची फेकाफेक केली. यावेळी फिर्यादीच्या पत्नीने समजावण्याचा प्रयत्न केला असता त्यांना चापट मारली. यावेळी मुलगा घरी आला असता त्याला लोटपोट करून शिवीगाळ करीत गाडीखाली चिरडून टाकण्याची धमकी दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी हारून खा यांच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास ना.पो.का. अमोल खराडे, पो.कॉ. इरफान शेख हे करत आहेत.

# बिबी येथे कडकडीत बंद !

जनसंचलन/बिबी



बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करणाऱ्या मुख्य सूत्रधाराला अटक करण्याच्या मागणीसाठी बिबी येथील सकल मराठा समाजाच्या वतीने २९ डिसेंबर रोजी बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला गावातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत दुकाने दिवसभर बंद ठेवली बिबी येथील बसस्थानक परिसर, तसेच आजूबाजूला असलेली दुकाने, प्रतिष्ठाने दिवसभर बंद होती. गावातील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बंदला प्रतिसाद दिला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन बिबी पोलिस स्टेशनच्या ठाणेदारांना देण्यात आले. यावेळी अमोल पालकर, संतोष बनकर, अमोल बनकर, केशव डहाळके, शिवप्रसाद बनकर, आकाश बनकर, शिवाजी बुरुकुल, अनिल मुळे, महादेव डुकरे, प्रदीप बनकर, गणेश तनपुरे, स्वप्निल बनकर, लक्ष्मण नरवाडे, ऋषिकेश दंदाले, योगेश डुकरे, आकाश जाधव, राजू कुहिटे, आदींसह इतर यावेळी उपस्थित होते

# लोणार-परतवाडा बसफेरीच्या वेळेत बदल

जनसंचलन/ लोणार

परतवाडा आगाराची लोणार-परतवाडा बसफेरीच्या वेळेत २८ डिसेंबरपासून बदल करण्यात आला आहे. सदर फेरी पूर्वी लोणार बसस्थानक येथून सकाळी ०६:०० वाजता सुटत होती, ती आता सकाळी ७ वाजता सुटत आहे. वेळ गैरसोयीची असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांना सदर फेरीने प्रवास करण्यास अडचण येत होती. प्रवाशांच्या मागणीनुसार प्रवासी सेवा संघटना लोणार यांनी प्रादेशिक व्यवस्थापक नागपुर यांच्याकडे परतवाडा बसफेरीच्या वेळेत बदल करण्याची मागणी केली होती. त्यानुसार विभाग नियंत्रक अमरावती यांच्याकडे फेरीच्या वेळेत बदल करणे बाबत सूचना देण्यात आल्याने विभाग नियंत्रक अमरावती व विभागीय वाहतूक अधिकारी अमरावती यांनी आगार व्यवस्थापक परतवाडा यांना लोणार-परतवाडा बसफेरी लोणार बसस्थानक येथून सकाळी ६ ऐवजी ७ वाजता सोडणे बाबत सूचना दिल्या



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ती प्रेमाने ने-आण करीत होती.. तरी, तब्बल १८८ विद्यार्थ्यांनी दिला धोका!




**जनसंचलन/बुलढाणा**

ती बिचारी वेळेवर येत होती.. वेळेवर जात होती..कधी कधी थोडा विलंब व्हायचा! परंतु शालेय विद्यार्थ्यांना शाळेत व कॉलेजमध्ये पोहचून देत होती. तिच्या प्रेमात सगळेच विद्यार्थी पडले होतेच! तिला कोण नाही चाहणार? तिची प्रतीक्षा प्रत्येकांना दररोज राहायची! कधी ती आली नाही तर तिच्या विरहात अनेकजण दुखी व्हायचे! तिला शिव्या शापही द्यायचे! पण तिच्याशिवाय कुणाला करमेना! कारण ती योग्य स्थळी वेळो वेळी ज्याला त्याला पोहोचवायची!आताही पोचवतेच! झाले काय?तर तब्बल १८८ विद्यार्थ्यांनी बोगस कार्ड बनवून या लालपरीला धोका दिला! या लालपरीची कहाणी अशी आहे की, ती राज्य परिवहन महामंडळाच्या आदेशाने दररोज वेळापत्रकानुसार धावते..विद्यार्थी असो किंवा जेष्ठ..दिव्यांग किंवा अन्य प्रवासी त्यांना त्यांच्या ठिकाणी नेऊन देण्याचे आणि परत आणून देण्याचे कामही करते.. परंतु नियमानुसार या लालपरीचा प्रवास करायचा असेल तर तिकीट काढावे लागते. ते सर्वच काढतात..आणि प्रवास करतात.. लालपरीने शासकीय योजनेतून काही घटकांना सवलत दिली आहे. ज्येष्ठांना मोफत प्रवास तर महिलांना ५० टक्के सूट देण्यात आली.विद्यार्थ्यांसाठी देखील सवलत योजना लागू आहे.सवलत देऊनही,काही चिखली-मेहकर तालुक्यातील तब्बल १८८ विद्यार्थ्यांनी लालपरीची मस्करी करत, तिचीही दिशाभूल केली आहे.हे विद्यार्थी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र दाखवून प्रवास करत होते. या बोगस कार्डधारक विद्यार्थ्यांना पकडण्यात आलं आहे.तुम्ही म्हणाल कसे? तर ऐका..बुलढाणा विभागात विद्यार्थी पासेसची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली होती.त्यामुळे याचा शोध घेण्यात आला. आगारप्रमुख, चालक-वाहक संबंधीत यांच्याशी चर्चा करण्यात आली.या चर्चेतून दिव्यांग बोगस कार्ड जास्त आहेत आणि त्या कार्डावरून मोफत प्रवास करत आहेत,विद्यार्थी पासेसच काढत नाहीत,असे लक्षात आले. त्यानंतर तपासणी मोहीम सुरू झाली.तब्बल १८८ डुप्लिकेट दिव्यांग कार्ड जप्त आले. या बोगस पासधारक विद्यार्थ्यांना संबंधित अधिकाऱ्यांनी समज दिली. पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करू असा इशाराही देण्यात आला.सदर प्रकार चिखली-मेहकर, देऊळघाट ,धाड या मार्गावर सुरू असून,भरारी पथकांना या मार्गावर कार्यान्वित करण्यात आले आहे,अशी माहिती हॅलो बुलढाणाला विभागीय वाहतूक अधिकारी दिगंबर जाधव यांनी दिली आहे.

# इमानदारी संपलीय! लाचखोरीत महसूल विभागाची आघाडी!...

## राजकीय अभयामुळे हिंमत वाढली?

**जनसंचलन/बुलढाणा**

लक्ष्मी भेट स्वीकारण्याची सवय अंगवळणी पडल्याने लाचखोरी वाढली आहे.शिवाय त्यांना राजकीय पाठबळ मिळत असल्याने मावळत्या वर्षात लाचखोरी मध्ये महसूल विभाग पुढे आहे.लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने एकुण १६ जणांवर कारवाई केलीय, मात्र त्यांना योग्य ती शिक्षा व्हायला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सरकारी पगार असतानाही लोकसेवक सामान्य लोकांकडून लाच स्वरूपात पैसे घेतात. याच्या तक्रारी प्राप्त होताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सापळा रचून कारवाया केल्या जातात. डिसेंबर २३ ते २४ नोव्हेंबर अखेरपर्यंत जिल्ह्यात १६ कारवाया करण्यात आल्या आहेत. यात लाच घेण्यात महसूल विभाग पहिल्या स्थानावर असून,नगर प्रशासन व सामान्य रुग्णालय यांचा क्रम लागतो. इमानदारी संपली का? सरकारी पगार पुरेना, अशीच परिस्थिती जिल्ह्यात आहे. लाच देणे आणि घेणे कायद्याने गुन्हा आहे. असे असले तरी काही अधिकारी, कर्मचारी सामान्यांची नियमात असणारी कामे अडवतात. त्यांच्याकडून अगदी ३००० रुपयांपासून ते हजारो रुपयांपर्यंत लाचेची मागणी करतात; परंतु




काही सुजाण नागरिक या लाचखोर लोकसेवकांची एसीबीकडे तक्रार करतात. येथील पथक सर्व शहानिशा करते. त्यानंतर मग पडताळणी करून सापळा लावतात आणि लाच घेताच त्याला पकडतात. या चालू वर्षात एसीबीने १६ कारवाया करून मासे गळाला लावले आहेत.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958